Vol. 1, Issue II / March 2011, pp.123-125

Research Paper - Psychology

# भारतीय मानसशास्त्राची तत्वमीमांसा

- प्रा.कळलावे एम. जी.
- प्रा. शिंदे जे.एस.
डॉ. बा. आ. म. विद्यापीठ, उस्मानाबाद

**प्रस्तावना:**

युरोपीय शास्त्रज्ञ प्लेटो आणि भारतीय शास्त्रज्ञ पंतजलि यांच्यापासून सुरुवात करुन मनाच्या बाबतीत विचार करायचा प्रयत्न आजही होतो आहे. मन काय आहे? कसे आहे? मानवी मनो मंदिरात राहणाऱ्या गूढ आणि रहस्यमय भावना कशा समजून घ्यायच्या, त्यातून मार्ग कसा काढावा या विषयी विचार झाला आहे. पण विचार करणाऱ्या प्रत्येकाने मनाचा एक विशिष्ट भाग अस्पष्टपणे स्विकारुन त्याची चर्चा केली आहे. या विचार प्रक्रियेतून मानसशास्त्रात जेवेगवेगळे पंत निर्माण झाले(उदा-साहचर्यवाद,वर्तनवाद इ.) त्यानी एक विशिष्ट विचार उचलला मनाचा विशिष्ट भाग स्विकारला आणि त्याचा परिणाम त्यांच्यावर झाला. पण भारतीय मानसशास्त्रज्ञाने मनाच्या सर्व भागाचे विवेचन केले. हे मानसशास्त्रातील या विविध विचार प्रवाहांच्या प्रभावामुळे दृष्टी आड झाले. यावर काही लोक असे ही म्हणतील की, भारतात मानसशास्त्राचा विकास झालेलाच नाही. भारतीयांनी अध्यात्माचा स्विकार केला, समाधीचा स्विकार केला, गुढवाद उचलला पण मानसशास्त्राचा अभ्यास केला नाही. यावर आता पाश्चात्यांकडे संशोधन सुरु आहेत. या संशोधनातून असा निष्क़र्ष समोर येतोय की प्राचीन भारतीय ग्रंथ मानसशास्त्राचे उगमस्थाने आहेत. या निष्क़र्षाचे उदाहरण द्यायचे झाले तर उपनिषदातील **'संज्ञानं अज्ञानं प्रज्ञानं विज्ञानं मेधा दृष्टि धृतिर्म निर्मनीषा जूति: संकल्प: कृतुरसु: कामोवश इति ।'** येथे मानवी मनाच्या सर्व अवस्थांचे स्पष्ट दर्शन होते.

**भारतीय मानसशास्त्र एक पूर्ण शास्त्र**

कोणत्याही ज्ञान आणि विज्ञानाचा शास्त्राची उत्पत्ती आणि विकास यांच्या दोन अवस्था असतात.

१. अनुमानावस्था (Speculative Science) आणि २ निश्चितावस्था अनुमानावस्थेच्या दृष्टीने पाश्यात्याचे मानसशास्त्र खूप पुढे आहे. पण निश्चितावस्थेच्या बाबतीत अतिशय मागे आहे. पाश्चात्य मानसशास्त्र मनोवृत्तीचे दर्शन घडविते पण त्यात मनोवृत्तींना रोखण्याचा आग्रह नाही आणि त्यामुळे मनोवृत्ती रोखण्याचा मार्ग ही ते दाखवत नाही. मनोवृत्ती बळावल्यावर त्याचा परिणाम काय होतो, त्यांना रोखायचे कसे,रोखणे योग्य की अयोग्य याचा विचार केला नाही. पण भारतीय पतंजली योग शास्त्रात १ क्षिप्त २ विक्षिप्त ३ मूढ ४ एकाग्र ५ निरुध्द या मनाच्या ज्या पाच अवस्था बाबत तेउदासिन आहेत. हे वर्तमान कालीन मानसाशास्त्राच्या विविध संप्रदायाकडे तत्वमिमांसेच्या दृष्टिने पाहिल्याने आपल्याला लक्षात येते.

**भारतीय मानसशास्त्रातील मनाच्या मुख्य अवस्था:**

भारतीय मानसशास्त्र जागृत मनाच्या मुख्य पाच अवस्था मानते.

१ जागृत २ स्वप्न ३ सुषुप्ति ४ तुर्या ५ समाधि, यातील स्वप्न आणि सुषुप्तिला पाश्चात्य मानसशास्त्रज्ञ Subconsiusness म्हणतात. परंतु त्यापलीकडची

समाधि अवस्था अलौकिक आहे. भारतीय मानसशास्त्रात समाधि अवस्थेचे सर्वांगिण विवेचन आहे. मनाच्या ह्या ज्या समाधि अवस्थेचे विवेचन आहे ते निर्णायक, अंतिम मानले जाते. मनाची एक ज्ञात व एक अज्ञात स्थिती आहे. मनाची अज्ञात स्थिती (Unconscious ) आणणे म्हणजे समाधी नव्हे. पाश्चात्य मानसशास्त्र या अज्ञात स्थितीलाच समाधि म्हणते. समाधि वेगळी आणि अज्ञात स्थिती वेगळी. या दोन बाबीचे वेगळेपण भारतीय तत्वज्ञ स्वामी विवेकानंदानी स्पष्ट केले. ते म्हणतात "When a man goes into Samadhi, if he goes into it a fool, he comes out a sage. "याचा अर्थ इतक्या सहजतेने हे होत असे नाही. परंतू तात्पर्य असेकी समाधित काही ना काही मिळते या पाचव्या अवस्थेचा सखोल विचार जर केला तर मानवी शारीरीक विकासाच्याच नाही तर मानसिक विकासाच्या अवस्था व तत्वे सापडतात आणि मनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र या व्याख्येचा उलगडा भारतीय मानसशास्त्र करते. त्यामुळे भारतीय मानसशास्त्रात ह्या व्याख्यांचे मूळे सापडते आणि मनाचे रुप व आत्म्याचे स्वरुप उलघडून दाखवण्याचे कार्य भारतीय मानसशास्त्र करते हे स्पष्ट होते.

**पाश्चात्य विचारधारा व भारतीय मानसशास्त्र मिमांसा:**

पाश्यात्य मानसशास्त्रात अनेक पंथ आहेत. मन, इच्छा, वासना, भावना, संकल्प, हेतु, इत्यादी मनोविकार आणि अविष्कार न मानणारा एक पंथ निर्माण झाला. त्या पंथाचे प्रमुख होते वॉटसन. त्यांच्या मते मनाला जशी परिस्थिती प्राप्त होईल तसे ते बनते. मनाला स्वतंत्र अस्तित्वच नाही. ते म्हणतात Man is a machine and his every action is th e outcome of mechanical process. दुसरा एक प्रभावी पंथ आला ज्याचा उगम झाला वैद्यकशास्त्रातून आणि त्याचे निर्णय(Counclusions) घेतले गेले मानसशास्त्रातून. त्याने मनाच्या अज्ञात स्थितीचे देखील वर्णन केले आहे. ज्याला अज्ञ म्हणतात. त्याबद्दल त्यांनी विचार केला आहे आणि त्याला महत्वही दिले आहे. तो पंथ आहे फ्राईड, एडलर आणि ह्यूमचा . यांनी अज्ञात मनाला कशा रितीने वर आणायचे या विषयी विचार केला आहे. कामुक भावनेला मूलभूत मानले. तिसरा एक पंथ आहे मॅकडयूगलचा त्याने एक समाज मानसशास्त्र उभे केले. यांनी सहज प्रेरणा (instincts)भावना (emotion) आणि स्थिरवृत्ती (sentiment) मानल्या आहेत. मॅकडयूगलने Social Psychology मध्ये एक कामूक प्रेरणा नावाचे परिशिष्ट जोडलेले आहे. त्यात Sex instinct चा विचार केलेला आहे. भूक ही instinct ने येते असेमॅगड्यूगला मानतो पण भारतीय मानसशास्त्र sex instinct चा विचार करत असतांना एक वेगळ्या भूमिकेतून याकडे बघते. ती म्हणजे Sexual निराळे sex Character निराळे sex feeling निराळी आणि sex impulse निराळी आहे. एवढा खोलवर विचार केवळ भारतीय ग्रंथात सापडतो. या सर्वात अतिशय सूक्ष्म फरक आहे. या प्रभावी वृत्तीचे जीवनात स्थान काय आहे? ही वृत्ती शारीरीक की मानसिक? ही वृत्ती निर्माण करण्याचे कारण काय? हेतू काय? ती केव्हा निर्माण होते. यावर फ्राईडने ती पाच ते सहा वर्षाच्या बालकत असते हे सांगून बाजूला झाला. फ्राईडनेयास केवळ शारीरीक पातळीवर मांडले. पण हिच बाब शारीरीक नसून मानसिक वृत्तीची अत्यूच्च पातळी होय याचेदर्शन सांख्य तत्वज्ञान घडवले.

भारतीय मानसशास्त्राची तात्विक मिमांसा जेव्हा आपण जाणून घेतो तेव्हाच हे कळू शकेल की ही जी

मनोवृत्ती आहे ती अंतिम,वात्सल्यवृत्ती आणि शृंगारवृत्ती पर्यंत जाईल. काही पाश्यात्य तत्वज्ञ सुध्दा या मनोवृत्तीला Interllectual love of the divine म्हणतात. ते सांगतात की हे वैषयिक रुप नाही; वैषयिक मिश्रण आहे. तर भारतीय महापुरुष सांगतात की ही अवस्था भक्तिमध्ये जेव्हा येते, तेव्हा ती नग्न कामवासना किंवा विषयवासना नसते. तर तो बुध्दी , मन व आत्मा यांच्या एकरुपतेचा,एकाग्रतेचा परमोच्च बिदू असतो. अनेक अभ्यासक यास शृंगारवृत्तीचे रुपक मानतात आणि हे रुपकात्मक आहे असे म्हणून थांबतात. परंतू ज्यांनी वासनांचा त्याग करण्यासाठी जन्मजन्मांतरापर्यंत प्रयत्न केले. एवढेच नाहीत तर कामवासनेला जिंकून घेतले त्यांना ही उपमा अथवा रुपक वापरण्याची गरज काय आहे? ज्यांनी या जन्मातच नव्हे तर जन्मांतरापासून कामवृत्तीला जिंकून टाकले आहे त्या लोकांसाठी हे शृंगारवृत्तीचे रुपक आहे की अनुभव आहे? इथपर्यंत मानसाशास्त्रीय विचार जेव्हा येतो तेव्हा ती वस्तूस्थिती आहे, अनुभव आहे असे भारतीय संत,ग्रंथ,ऋषी , आचार्य सांगतात. मग ते वल्लभाचार्य असोता, चैतन्य महाप्रभू असोत किंवा शंकराचार्य असोत. त्यामुळे या महापुरुषाच्या विचारांची चरणावस्था आपण जोपर्यंत समजून घेणार नाही तोपर्यंत मानसशास्त्रीय तत्वांच्या , संकल्पनाच्या शब्दापलीकडील अर्थापर्यंत आपणास जाता येणार नाही.

**सारांश**

मानसशास्त्रीय तत्वांचे विश्लेषण करायचे असेल तर कोणते मानसशास्त्र स्विकारार्ह आहे? (याचा अर्थ असा नाही की मानसशास्त्र दोन आहेत.)पण भारतीय विचारधारेच्या आधारे तात्विक मिमांसेच्या दृष्टीकोनातून मानसशास्त्रीय तत्वे, संकल्पना, सिध्दांत यांचा अभ्यास केला तर मानसशास्त्राचे यथार्थ दर्शन आपणास होऊ शकेल.

**संदर्भ:**


- द्रविड, डॉ. नारायणशास्त्री (२००९) भारतीय तत्वज्ञानातील प्रमाणमीमांसा . नागपूर : रामकृष्ण मठ.
- गीतेचे पंचप्राण, मुंबई : सद्विचार दर्शन